## ‘उद्योगांच्या विकासाकरिता मोदी सरकार कटीबध्द’ - अनंत गीते




लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटरच्या संयुक्त विद्यमाने स्थापित करण्यात आलेल्या वर्ल्ड एसएमई ट्रेड सेंटरचे उद्‌घाटन केंद्रिय अवजड उद्योग मंत्री श्री. अनंत गीते यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी आयुर्विमा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. एस.बी. मैनाक, कॅनरा बँकेचे चेअरमन श्री. आर. के. दुबे, चेंबरचे संस्थापक अध्यक्ष श्री. चंद्रकांत साळुंखे, भारत सरकारच्या परमाणु उर्जा विभागाचे माजी अध्यक्ष डॉ. श्री. अनिल काकोडकर, स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थाकिय संचालक श्री. पी. के. मल्होत्रा, सीडबीचे व्यवस्थापकिय संचालक श्री. एन. के. मैनी , चेंबरचे पुणे विभागिय अध्यक्ष श्री. संजय चोरडिया इ. मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या आणि औद्योगिक उत्पादन व निर्यातीबरोबरच रोजगार निर्मितीसारख्या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणा-या लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाकरीता मोदी सरकार कटीबद्ध असल्याची ग्वाही देतानाच या उद्योगांच्या सर्वांगीण विकासाकरिता केंद्राकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंत गीते यांनी लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या परीषदेच्या उद्घाटनप्रसंगी दिले.

सदर समारंभास भारत सरकारच्या परमाणु उर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष अनिल काकोडकर, कॅनरा बँकेचे चेअरमन आर. के. दुबे, आयुर्विमा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एस.बी. मैनाक, स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक पी. के. मल्होत्रा, सीडबीचे व्यवस्थापकीय संचालक एन. के. मैनी आणि लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकात साळुंखे उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची पत सुधारत असून विदेशी उद्योजक, आणि गुंतवणुकदारांना भारतीय अर्थव्यवस्थेत एकाचवेळी प्रचंड मोठ्या सुधारणांची अपेक्षा असल्याने भारतात उद्योग धंदे उभारण्याच्या पंतप्रधानाच्या आवाहनाला आंतरराष्ट्रीय पातळीवर भरीव प्रतिसाद मिळत आहे त्यामुळेच ‘भारतीय लघु व मध्यम उद्योगांना खरोखरच ‘अच्छे दिन आनेवाले है’ असे आश्र्वासक उद्गार त्यांनी यावेळी काढले.

लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रक्रांत साळुंखे यांनी आपल्या प्रास्तविकात देशांतर्गत लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाचा आढावा घेत या उद्योगांसमोरील विविध अडचणी विशद केल्या; त्याचबरोबर मोठ्या उद्योगांकडून लघु व मध्यम उद्योजकांना योग्य सहकार्य मिळत नसल्याची खंत व्यक्त केली.

अनंत गीते आणि अनिल काकोडकर यांच्या हस्ते वर्ल्ड एसएमई ट्रेड सेंटरचे उद्घाटन आणि कॅनरा बँकेच्या एमएसएमई एक्सपो टर्म लोन स्किम फॉर एक्सपोर्ट या विशेष योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

गीते यांच्या हस्ते यावेळी उद्योग आणि सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या २० उद्योजकांना चेंबरच्या वतीने इंडिया एसएमई एक्सलेंन्स वॉर्ड या पुरस्कारांनी गौरविण्यात आले; यामध्ये तेलवणे पॉवर इक्विपमेंट प्रा. लिमिटेडचे श्री. राकेश तेलवणे, प्रताप ऑरगॅनिक्स प्रा. लिमिटेडचे प्रतापसिंग देशमुख, राधेया मशिनिंग लिमिटेडचे संजय अंबादासराव जोशी या प्रमुख मराठी उद्योजकांचा समावेश आहे. सदर परीषदेस देशभरातून किमान ५०० उद्योजक उपस्थित होते.

## औरंगाबादमध्ये सॅप इनोव्हेशन एक्सप्रेसचा बस रोड शो

सॅप इनोव्हेशन एक्स्प्रेसच्या रोड शोच्या माध्यमातून औरंगाबाद आणि परिसरातील उद्योगांचा विकास करण्याच्या दृष्टिने प्रयत्नरत राहण्यासाठी आपली कंपनी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार ‘एक्सपर्ट ग्लोबल सोल्युशन्स’ने केला. भारतभरातील हा अशा प्रकारचा पहिलाच बस रोड शो असून भारतीय उद्योगांना व्यवसायात एक विशिष्ट उंची गाठता यावी तसेच सॅप सोल्युशन्सच्या क्षमतेबाबत अधिकाधिक माहिती व्हावी या यामागील उद्देश होता.




मराठवाडा ऑटोक्लस्टरतर्फे आयोजन करण्यात आलेल्या या कार्यक्रमात राम भोगले (अध्यक्ष, अप्लाईड इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी ग्रुप तथा अध्यक्ष, मराठवाडा ऑटोक्लस्टर) आणि मुनीश शर्मा (महासंचालक, एमआयटी तथा अध्यक्ष सीएमआयए) यांच्या हस्ते बसचे उद्घाटन झाले.

उद्योगात सर्वोत्कृष्टता साध्य करण्यासाठी आणि सॅपच्या क्षमतांची संपूर्ण माहिती करून घेण्यासाठी स्थानिक उद्योगांनी या संधीचा उपयोग करावा असे आवहन मुनीश शर्मा यांनी केले.

विविध सॅप बिझनेस सोल्युशन्सचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी सॅप इनोव्हेशन एक्स्प्रेसने व्हेरॉक ग्रुप, बडवे ग्रुप, अजंता फार्मास्युटिकल्स आणि एमआयटी कॉलेज ऑफ इंजिनियरींग यांच्या परिसराला भेट दिली.

यापुढेही सॅपसारखे सर्वोत्तम तंत्रज्ञान या भागात आणण्यासाठी प्रयत्न करत राहणार असल्याचे आश्वासन प्रशांत देशपांडे (व्यवस्थापकीय संचालक - एक्सपर्ट ग्लोबल सोल्यूशन्स) यांनी याप्रसंगी दिले.



© 2010 All Rights Reserved